# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.12.2024** **वार – मंगळवार**

---

**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन**

स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीत सहभागी होत असलेल्या विद्यार्थ्यांशी  पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या दूरस्थ माध्यमातून संवाद साधणार आहेत. या स्पर्धेत 13शे हून अधिक विद्यार्थी संघ सहभागी होत आहेत. मुंबई पुण्यासाह देशातल्या 51 केंद्रांवर ही स्पर्धा होणार आहे. पुण्याच्या एमआयटी विद्यापीठामध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेच्या हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होणार आहे. उद्या पासून येत्या 15 डिसेंबरपर्यंत ही महाअंतिम फेरी चालेल.

**पुणे पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उद्या दुपारी 12 ते 1 या वेळेत 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम घेण्यात येणार आहे. या उपक्रमात महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक सहभागी होणार आहेत. हा उपक्रम सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालये, पुणे विमानतळ, मेट्रो स्थानक, पीएमपीएमएल बसस्थानक, रिक्षा थांब्यांवरही होणार आहे. या उपक्रमात पुणेकरांनी मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**पादचारी दिन**

पुणे महापालिकेतर्फे उद्या लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शहर पोलिसांनी लक्ष्मी रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गाने वळवली आहे. सकाळी 8 ते रात्री 8 वाजेपर्यंत वाहतुकीतील बदल लागू असतील. नागरिकांनी आणि वाहनचालकांनी या बदलांची माहिती घेऊन त्यानुसार प्रवासाचं नियोजन करावं, असं आवाहन वाहतूक पोलिसांनी केलं आहे.

**पुणे म्हाडा**

पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाच्या पुणे विभागातील सहा हजार 294 घरांसाठी अर्ज करण्यासाठी आता पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज करण्यासाठीची आज अंतिम तारीख होती; मात्र आता सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी येत्या 31  डिसेंबरपर्यंत  मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदतवाढ दुस-यांदा देण्यात आली आहे. अनामत रक्कम स्वीकृती अंतिम मुदत 2 जानेवारी 2025 पर्यंत आहे. सोडत 28 जानेवारी 2025 रोजी काढण्यात येणार आहे, अशी माहिती म्हाडा पुणे विभागाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली.

**पुरस्कार**
विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना आज चिदानंद फाऊंडेशनतर्फे पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते या संस्थांना सन्मानित करण्यात आलं. वैद्यकीय शास्त्रानं कितीही प्रगती केली असली तरी मानसिक आणि शारीरिक पातळीवर आजही असे काही आजार आहेत की, ज्याची विज्ञानाकडे उत्तरे नाहीत. अशा आजारांनी ग्रस्त रुग्णांना सांभाळणे म्हणजे त्या कुटुंबासाठी सर्वच पातळ्यांवर मोठं आव्हान असतं. या कुटुंबियांना मदत करणाऱ्या संस्थांसाठी समाजानं मदतीचा हात पुढे करावा असं आवाहन गोडबोले यांनी यावेळी केलं. मानसिक विकलांग आणि ऑटीस्टिक मुलांची शाळा चालवणारे पुण्यातील प्रिझम फाउंडेशन, मानसिक विकलांगांसाठी निवासी शाळा चालवणारी उमेद परिवार संस्था, मानसिक आणि शारीरिक दिव्यांग मुलांसाठी फिजिओथेरिपी आणि वैद्यकीय मदत अल्प दरात देणारी चेतना फौऊंडेशन आणि गीर गाईचं संगोपन करणाऱ्या अलिबाग मधल्या सहयोग गोशाळा या संस्थांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

**फळझाड**
पुणे जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत 2024-25 या वर्षामध्ये अडीच हजार हेक्टरवर फळझाड लागवडीचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे. त्यापैकी नोव्हेंबर महिनाअखेर सुमारे 756 हेक्टरवर म्हणजे उद्दिष्टाच्या 30 टक्के क्षेत्रावर फळझाड लागवड पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. यंदा फळझाड लागवडीत शेतकऱ्यांचा सर्वाधिक कल आंबा आणि नारळ पिकाकडे आहे.

**क्रीडा**
दिल्ली बिलीयर्डस् आणि स्नुकर असोसिएशन यांच्यावतीने राष्ट्रीय स्नुकर अजिंक्यपद 10-रेड स्नुकर स्पर्धेची पात्रता फेरी पुण्यात 17 डिसेंबर रोजी होणार आहे. पुण्यातील खेळाडूंसाठी ही मोठी संधी असेल. देशातील सहा शहरांमध्ये या स्पर्धेची पात्रता फेरी होईल, त्यातली चौथी पात्रता फेरी पुण्यात होणार आहे. स्पर्धेची मुख्य फेरी दिल्लीमध्ये होणार आहे.

**कुस्ती**
बंगळूरमध्ये वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये महिला गटात पुण्याच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. मूळच्या अहमदनगरच्या मात्र पुण्यात सराव करणाऱ्या भाग्यश्री फंड हिने 62 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. तिने हिमाचलच्या खुशी ठाकूर हिच्यावर मात केली. 55 किलो वजनी गटात धनश्री फंड हिने कास्य पदकाची कमाई केली.

**हवामान**
पुणे आणि परिसरात उद्या हवामान कोरडं असेल, कमाल तापमान 30  तर किमान तापमान 13 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे **वृत्तांतमध्ये, नमस्कार.**